नि.फौ.ख.क्र. १८५/२०२३

सरकार –वि– पठाण शाहरुख खान

नि.क्र. १७

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – विशाल उमेश तायडे,

वय. २३ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

राहणार – गाडेगाव, ता. तेल्हारा, जिल्हा – अकोला.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

सन २०२३ मध्ये मी नागपुरला पेपर द्यायला गेलो होतो व त्याच दिवशी रात्रीला मी ट्रेनने शेगाव रेल्वे स्टेशनवर आलो. त्यानंतर मी शेगाव रेल्वे स्टेशनवर झोपलो असतांना एक व्यक्ती माझ्या जवळ आला व माझी ट्रेन किती वाजताची आहे व कोणती आहे याबाबत मला माहित नाही म्हणून तु तुझा मोबाईल दे असे मला म्हटले. त्यावेळेस माझ्याजवळ विव्हो कंपनीचा मोबाईल होता व त्या मोबाईलमध्ये माझ्याकडे एअरटेल कंपनीचा सिम कार्ड नं. ७८८७६२४४६५ हा होता. माझ्या जवळ असलेल्या मोबाईलची किंमत जवळपास सोळा ते सतरा हजार रुपये होती. त्या व्यक्तीला मी माझा मोबाईल दिला. त्या व्यक्तीने मोबाईलमध्ये त्याची ट्रेन चेक करुन मला मोबाईलमध्ये अजून बघायचे असल्याचे सांगितल्यानंतर त्याने माझा मोबाईल त्याच्या जवळच ठेवला. रात्रीचा प्रवास झाल्याने मी थकलो असल्यामुळे मी झोपून गेलो. तो व्यक्ती माझा मोबाईल घेवून गेला होता. माझ्याकडे आलेल्या व्यक्तीचे वर्णन मी सांगु शकत नाही. दिड दोन तासानंतर मला जाग आली असता मला माझा मोबाईल मिळून न आल्यामुळे मी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. आता मला अभिलेखावरील तक्रार व छापील एफ.आय.आर. दाखविला. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.१८ व १९</u>** देण्यात येते. मला पोलीस स्टेशनकडून माझा मोबाईल परत मिळाला. माझा मोबाईल कोणी चोरी केला होता याबाबत मला काहीही माहिती मिळाली नाही. ज्या आरोपीकडून मोबाईल जप्त करण्यात आला होता त्या आरोपीला मला पोलीसांनी दाखविले नव्हते. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. मोबाईल मला रेल्वे पोलीसांकडून मिळाल्यानंतर मला पोलीसांनी बोलविले

नव्हते. मोबाईल मिळाल्याचे रेल्वे पोलीसांनीच मला सांगितले होते. रेल्वे पोलीसांनी मला आरोपीचे नाव सांगितले नव्हते.

**<u>यावेळेस सरकारी वकीलांनी साक्षीदाराला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता परवानगी देण्यात आली.</u> :–**

२. दिनांक ०९.०८.२०२३ रोजी रेल्वे पोलीसांनी आरोपीला अटक करुन माझा मोबाईल जप्त केला होता की काय हे मला माहित नाही. आरोपीचे नाव पठाण खान महेबुब खान होते की काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळेस मी पोलीसांकडून मोबाईल घेण्यास गेलो होतो त्यावेळेस पोलीसांनी मला आरोपीचा फोटो दाखविला असता मी त्याचा फोटो ओळखला होता. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ मी पोलीसांना सांगितला नव्हता व तो पोलीसांनी माझ्या बयाणात का लिहिला याबाबत कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. माझा मोबाईल मला परत मिळाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीसोबत आपसात तडजोड केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीविरुध्द माझी तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत मी आपसात तडजोड केली असल्यामुळे आरोपीकडून मोबाईल जप्त न झाल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्रीमती एम. एस. शेगोकार, वकील यांनी नाकारला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२६.०२.२०२६ | दि.२६.०२.२०२६ |